POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२७९ ● मुंबई, मंगळवार, १२ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

रिअल इस्टेट क्षेत्रावर संकटाचे ढग

घरांच्या पजेशनला होणार उशीर; 'क्रेडाई'ची सरकारकडे मदतीसाठी धाव



क्रेडाईच्या प्रमुख मागण्या: परिस्थिती हाताळण्यासाठी क्रेडाईने सरकारसमोर काही प्रस्ताव

- जीएसटीमध्ये सवलत: सिमेंट आणि स्टीलवरील जीएसटी दरात कपात करावी.
- लिक्विडिटी सपोर्ट: रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी बँकांनी सुलभ दरात कर्ज उपलब्ध करून द्यावे.
- महारेरा कडून मुदतवाढ : नैसर्गिक संकटाप्रमाणेच या आर्थिक संकटाची दखल घेऊन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महारेराकडून अतिरिक्त मुदत मिळावी.



गृहखरेदीदारांना 'डबल' फटका
कच्च्या मालाच्या (सिमेंट, स्टील) किमतीत वाढ झाल्यामुळे विकासकांवरील आर्थिक ताण वाढला आहे. यामुळे दोन महत्त्वाचे परिणाम दिसून येत आहेत.



किमतीत वाढ
वाढलेला उत्पादन खर्च भरून काढण्यासाठी विकासक घरांच्या किमतीत १० ते १५ टक्क्यांनी वाढ करण्याच्या विचारात आहेत. यामुळे ग्राहकांना 'ईएमआय' सोबतच वाढीव किमतीचा भार सोसावा लागणार आहे.



पजेशनमध्ये विलंब
प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरू असल्यामुळे ग्राहकांना घराचा ताबा मिळण्यासाठी ६ महिने ते १ वर्षाचा उशीर होऊ शकतो.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

देशातील रिअल इस्टेट क्षेत्र सध्या एका मोठ्या संकटातून जात असून, याचा थेट फटका नवीन घर खरेदी करणाऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. कच्च्या मालाच्या किमतीत झालेली प्रचंड वाढ आणि मजुरांचा तुटवडा यामुळे बांधकाम प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होत आहे. या पार्श्वभूमीवर, विकासकांची शिखर संस्था असलेल्या 'क्रेडाई'ने केंद्र आणि राज्य सरकारकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची आणि मदत करण्याची मागणी केली आहे. जर सरकारने मदत केली नाही, तर हजारो घरांचे पजेशन रखडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बांधकाम खर्चाचे गणित बिघडल्यामुळे विकासक आणि ग्राहक दोघेही सध्या चिंतेत आहेत. महाराष्ट्रातील घरांचे स्वप्न पाहणाऱ्या मध्यमवर्गीयांसाठी पुढील काही महिने अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

पुढील काळात या संकटाचा गृहकर्जाच्या व्याजावर किंवा घरांच्या नोंदणी शुल्कावरही काहीसा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुणे आणि नाशिकमधील स्थिती महाराष्ट्रातील रिअल इस्टेट मार्केटमध्ये पुणे आणि नाशिक ही दोन महत्त्वाची शहरे आहेत. मात्र, सध्याच्या संकटामुळे येथील बाजारपेठेतही अस्वस्थता आहे. पुणे: आयटी हबमधील रखडलेले स्वप्न पुणे हे देशातील महत्त्वाचे आयटी आणि शैक्षणिक हब असल्याने येथे घरांची मागणी नेहमीच जास्त असते. मात्र, हिंजवडी, वाघोली आणि बाणेर यांसारख्या भागांत सुरू असलेल्या अनेक मोठ्या प्रकल्पांना कच्च्या मालाच्या दरवाढीचा मोठा फटका बसला आहे. पुण्यात मोठ्या प्रमाणावर 'मिडल इन्कम ग्रुप' (एमआयजी) घरे घेतली जातात, ज्यांच्यासाठी घराच्या किमतीत होणारी थोडीही वाढ बजेट विस्कळीत करणारी ठरत आहे. नाशिक: वाढत्या पायाभूत सुविधा आणि आव्हाने नाशिकमध्ये सध्या नवीन रिंग रोड आणि समृद्धी महामार्गामुळे रिअल इस्टेटमध्ये मोठी तेजी पाहायला मिळत आहे. मात्र, नाशिकमधील मध्यम आणि छोट्या विकासकांना वाढत्या खर्चाचा सामना करणे कठीण जात आहे. मोठ्या शहरांच्या तुलनेत नाशिकमध्ये नफ्याचे प्रमाण कमी असल्याने, किमतीत वाढ झाल्याशिवाय प्रकल्प पूर्ण करणे विकसकांसाठी अशक्य झाले आहे. यामुळे नाशिकमधील नवीन गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

एक वर्ष सोन्याची खरेदी का नको?

काय आहे पंतप्रधान मोदी यांचे 72 अब्ज डॉलरच्या फॉरेक्समागचे लॉजिक?



■मुंबई । प्रतिनिधी,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना एक वर्ष सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केल्याने देशभरात या विधानाची मोठी चर्चा सुरू झाली आहे. जागतिक स्तरावर वाढलेले तणाव, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती, रुपयावरील दबाव आणि परकीय चलन साठ्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन ही विनंती करण्यात आली आहे. भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर सोने आयात करतो आणि त्यासाठी अब्जावधी डॉलर परदेशात जातात. त्यामुळे सोने खरेदी कमी झाल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळू शकतो. पंतप्रधान मोदी यांनी 10 मे 2026 रोजी हैदराबादमधील कार्यक्रमात देशभक्तीचा अर्थ केवळ सीमेवर लढणे नसून कठीण काळात जबाबदारीने वागणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. त्यांनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्यासोबतच एक वर्ष सोने खरेदी टाळण्याचेही आवाहन केले. यामागे भारताचा परकीय चलन साठा मजबूत ठेवण्याचा आणि डॉलरची बचत करण्याचा उद्देश असल्याचे मानले जात आहे. भारताचा 72 अब्ज डॉलरचा सोने आयात खर्च भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सोने खरेदी करणारा देश आहे. देशात दरवर्षी सुमारे 700 ते 800 टन सोन्याची मागणी असते, तर देशांतर्गत उत्पादन अत्यंत मर्यादित आहे. त्यामुळे गरजेपैकी सुमारे 90 टक्के सोने आयात करावे लागते. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताने सुमारे 72 अब्ज डॉलर किमतीचे सोने आयात केले. हे मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे 24 टक्क्यांनी अधिक आहे. परकीय चलन साठ्यावर काय परिणाम? भारताचा परकीय चलन साठा सध्या सुमारे 690 अब्ज डॉलरच्या आसपास आहे. मात्र जागतिक अस्थिरता आणि वाढत्या आयातीमुळे त्यावर दबाव निर्माण झाला आहे. सोने आयातीसाठी मोठ्या प्रमाणावर डॉलर खर्च होतात. जर देशातील नागरिकांनी काही काळासाठी सोने खरेदी कमी केली, तर डॉलरची बचत होऊन परकीय चलन साठा मजबूत राहण्यास मदत होईल.

मान्सूनपूर्व तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सविस्तर आढावा

सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

■ठाणे। प्रतिनिधी,

आगामी पावसाळ्यात जिल्ह्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये, यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच सतर्क राहून समन्वयाने पूर्वतयारी करावी. जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा चोख असावा आणि आपत्कालीन स्थितीत तत्काळ मदतीसाठी 'आपदा मित्रां'ची संख्या वाढवावी, असे निर्देश ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक २०२६' समिती सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी सजेर्राव मस्के-पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल, साकव आणि जुन्या इमारतींचे ऑडिट करावे. जलसंपदा विभागाने धरणांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अहवाल सादर करावा. राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्सून काळात दरडी कोसळण्याच्या घटना लक्षात घेऊन प्रमुख घाटांमध्ये जेसीबी, पोकलेन आणि डंपरची कायमस्वरूपी व्यवस्था करावी. डॉ.पांचाळ यांनी आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची गतिशीलता तपासण्यासाठी अग्निशमन दल, पोलीस आणि आरोग्य विभागाने प्रत्येक तालुक्यात रंगीत तालीम घ्यावी. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाने औषध साठा आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत अशा सूचना देवून आपत्ती निवारणासाठी आवश्यक साधनसामुग्रीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अनुदान उपलब्ध करून दिले जाईल,असे स्पष्ट केले.



जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी यावेळी दरडप्रवण गावे, पूरप्रवण क्षेत्रे, नदीतील गाळ काढणे, औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा आणि शोध-बचाव साहित्याची उपलब्धता यांचा सविस्तर आढावा घेतला. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची माहिती दिली. सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना आपापल्या स्तरावर नियंत्रण कक्ष (Control Rooms) तातडीने स्थापन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

भारताकडे किती दिवसांचा पेट्रोल, डिझेल आणि LPG साठा?

नागरिकांनी घाबरू नये
केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे की देशातील इंधन पुरवठा पूर्णपणे सुरक्षित आहे. त्यामुळे पेट्रोल पंपांवर गर्दी करण्याची किंवा अतिरिक्त साठा करण्याची आवश्यकता नाही. नागरिकांनी संयम बाळगून इंधनाचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



भारताकडे 60 दिवसांचा कच्च्या तेलाचा साठा
सरकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताकडे 60 दिवसांचा कच्च्या तेलाचा साठा, 60 दिवसांचा नैसर्गिक वायू साठा आणि 45 दिवसांचा एलपीजी साठा उपलब्ध आहे. याशिवाय देशाचा परकीय चलन साठा सुमारे 703 अब्ज डॉलरच्या मजबूत पातळीवर असल्याचंही सांगण्यात आलं.\

इंधन बचतीमागील आर्थिक कारणे
पंतप्रधान मोदी यांनी 10 मे रोजी देशवासियांना पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचं, सार्वजनिक वाहतूक वापरण्याचं आणि शक्य असल्यास वर्क फ्रॉम होमचा विचार करण्याचं आवाहन केलं होतं. यामुळे इंधन आयातीवरील खर्च कमी होऊन परकीय चलनाची बचत होईल, असा सरकारचा उद्देश आहे.

■नवी दिल्ली । प्रतिनिधी,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पेट्रोल-डिझेल आणि गॅसचा वापर जपून करण्याचं आवाहन केल्यानंतर केंद्र सरकारने महत्त्वाचं स्पष्टीकरण दिलं आहे. देशात पेट्रोल, डिझेल, एलपीजी किंवा कच्च्या तेलाचा कोणताही तुटवडा नसून नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. भारताकडे 60 दिवसांचा कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा साठा उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली. पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोजित मंत्रिमंडळाच्या गटाच्या बैठकीनंतर अधिकाऱ्यांनी देशातील ऊर्जा सुरक्षेचा आढावा घेतला. या बैठकीत भारताने आवश्यक इंधनाचा पुरेसा साठा करून ठेवला असून पुरवठा साखळी अखंडित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्याचं सांगण्यात आलं. पेट्रोलियम उत्पादनांचा कोणताही तुटवडा नाही भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा तेल शुद्धीकरण करणारा देश असून 150 हून अधिक देशांना पेट्रोलियम उत्पादने निर्यात करतो. देशांतर्गत मागणी पूर्णपणे भागवली जात असून नागरिकांनी कोणत्याही प्रकारची भीती बाळगण्याची किंवा इंधन साठवण्याची गरज नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं. तेल कंपन्यांचा मोठा आर्थिक भार सरकारच्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतीचा भार सामान्य नागरिकांवर पडू नये म्हणून भारतातील तेल विपणन कंपन्या दररोज सुमारे 1,000 कोटी रुपयांचे नुकसान सहन करत आहेत.

पहिल्या तिमाहीत त्यांच्या वसुलीत सुमारे 2 लाख कोटी रुपयांची घट झाल्याचंही सांगण्यात आलं.

आधी विजेचा धक्का,नंतर कंटेनर अंगावरून गेला

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर शहराजवळ असलेल्या सातपाटी पोलीस ठाणे हद्दीतील बिडको परिसरात कंटेनर वळवताना घडलेल्या भीषण अपघातात एका कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विजेचा धक्का लागून खाली पडलेल्या कामगारावरून कंटेनरचे मागील चाक गेल्याने हा दुर्दैवी अपघात घडला. शनिवारी ९ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे ३:३० वाजण्याच्या सुमारास कंटेनर चा चालक साहब जगन सिंह हा वाहनात माल लोड करण्यासाठी रस्त्यावरून कंटेनर वळवत होता. त्यावेळी तक्रारदार ऑसू हेम सिंह व त्यांच्यासोबत असलेले कामगार सुदीश मुन्नालाल यादव हे चालकाला वाहन वळविण्यास मदत करत होते. यादरम्यान कंटेनरच्या बॉडीचा धक्का एमईसीबीच्या केबलला लागला. त्याच वेळी कंटेनरवर चढलेल्या सुदीश यादव यांना जोरदार विजेचा धक्का बसल्याने ते खाली कोसळले. परिसरातील लोकांनी आरडाओरडा सुरू केला. मात्र चालकाने आजूबाजूची परिस्थिती न पाहता कंटेनर पुढे नेल्याने खाली पडलेल्या सुदीश यादव यांच्या छाती व डोक्यावरून कंटेनरचे डाव्या बाजूचे मागील चाक गेले. गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून सातपाटी पोलीस ठाण्यात या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१), २८१ सह मोटर वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी अपघाताचा गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. मृत सुदीश मुन्नालाल यादव (वय ४०) हे मूळचे उत्तर प्रदेश राज्यातील कासगंज जिल्ह्यातील तोलकपुर पोस्ट सोरो येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

नराधम बापाकडून दोन्ही लेकींवर लैंगिक अत्याचार; बाप लेकीच्या नात्याला काळीमा

■कल्याण। प्रतिनिधी,

डोंबिवली शहरात बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आल्याने संपूर्ण शहरभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. एका वासनांध बापाने त्याच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची अत्यंत लाजीरवाणी घटना समोर आली आहे. याप्रकरणी मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करत या 45 वर्षीय नराधमाला अटक केली आहे. दरम्यान या प्रकरणी तिच्या आईची भूमिका काय होती? तिने विरोध केला होता का? याचा तपास आता पोलीस करत आहेत. डोंबिवली पूर्वेतील मानपाडा परिसरात राहणाऱ्या या बापाला दोन मुली आहेत. तो कोणताही काम धंदा करत नाही तर त्याची पत्नी काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. कामानिमित्त त्या व्यक्तीची पत्नी बाहेर असल्याने या संधीचा फायदा घेऊन हा विकृत बाप त्याच्या १९ वर्षे मोठ्या मुलीवर काही महिन्यांपासून लैंगिक अत्याचार करत होता. मात्र घाबरलेल्या मुलीने आईला अथवा कोणालाही ही माहिती सांगितली नाही. त्यामुळे त्या विकृत बापाची हिंमत अधिक वाढली. बापाकडून होणारा लैंगिक अत्याचार ही मुलगी अनेक महिन्यांपासून सहन करत होती. त्यानंतर या नराधमाची मजल आणखीन वाढली आणि त्याने त्याच्या १० वर्षांच्या मुलीवरही लैंगिक अत्याचार केला. हा प्रकार लक्षात येताच मोठ्या मुलीने या विरोधात आवाज उठवत आईला घडलेला सगळा प्रकार सांगितला. हे ऐकून आईच्या पायाखालची वाळू सरकली. त्यानंतर तिने लागलीच मानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन नराधम आणि विकृत पतीविरोधात तक्रार केली. पोलिसांनी तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत गुन्हा दाखल केला आणि लगेचच आरोपी बापाला अटक केली.





संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

वंदे मातरमचा व्यापक विचार व्हावा



बंकिमचंद्र चटर्जी यांचे वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत आहे, परंतु त्याला जन गण मन सारखा राष्ट्रगीता चा दर्जा नाही. केंद्रातील मोदी सरकार या राष्ट्रीय गीता ला राष्ट्रगीता सारखाच दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करत आहे, त्याच मोदी सरकारचे कायम विरोधक असलेल्या काँग्रेसच्या पक्षाच्या अधिवेशनात वंदे मातरम अधिकृतरित्या पहिल्यांदा गायले गेले होते. वंदेमातरम आणि जनगणमन यांची भारतासाठी उपलब्ध झाली ती बंगालच्या संस्कृतीतूनच, बंकिमचंद्र चटर्जी आणि रवींद्रनाथ टागोर या दोन्ही महनीय व्यक्तीमत्वांची कर्मभूमी बंगालच राहिली आहे. मात्र बंगालमध्ये या दोन्ही गीतांच्या मुद्द्यावरून कधी वाद झाल्याचा इतिहास नाही. मग आताच वंदे मातरमच्या विषयावरून विवादाची गरज का पडली असावी? देशातील राष्ट्रीय प्रतीके, गीतांचा राजकीय वापर करण्यात सत्ताधारी वाकबगार आहेत. सुरुवातीला राष्ट्रीय मुद्रा असलेल्या अशोक स्तंभावरील तीन सिंहांना आक्रमकतेने सादर करण्यात आले. त्यानंतर सभागृहातील सेंगोल मध्ये झालेला बदल आणि आता राष्ट्रगीताच्या बरोबरीने राष्ट्रीय गीताला उभे करण्यामागील केंद्राच्या सत्ताधार्यांचा राजकीय हेतू लपून राहिलेला नाही. वंदे मातरम हे गीत देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या प्रेरणेचे गीत असल्याने त्याचा थेट ठळक संबंध काँग्रेसच्या इतिहासाशी राहिला आहे, सत्ताधार्यांच्या सांस्कृतिक इतिहासाशी नाही. वंदे मातरम या गीताला राष्ट्रगीतासमान दर्जा मिळाल्यास कायद्यानुसार हे गीतही नागरिकांसाठी बंधनकारक होईल, अर्थातच या वंदे मातरमला देशातील काही मुस्लीम गटांचा विरोध असल्याने त्याआडून अल्पसंख्याकांना नामोहरम करण्याची केंद्राची ही खेळी आहे का, असा प्रश्न निर्माण व्हावा. देशाच्या सांस्कृतिक प्रतिकांमध्ये बदल करून केंद्राला काय साध्य करायचे आहे? महाराष्ट्रातही वारकरी सांप्रदायाच्या जय श्री रामकृष्ण हरी, पांडुरंग माऊली किंवा ग्रामीण भागात सामान्यपणे अभिवादन करण्यासाठी बोलल्या जाणारा राम राम या संबोधनासामोर जय श्रीरामची आक्रमक घोषणा उभी करण्याचा प्रयत्न करण्यामागील कारणे काय आहेत? वंदे मातरम या गीताचा अर्थ भारत मातेला वंदन अशा अथार्ने कडव्या एकेश्वरवादी समुहांना अडचणीचा ठरणार आहे. त्यामुळे त्यातून आपले धार्मिक विरोधाचे राजकारण पुढे रेटण्याचा हा प्रयत्न स्पष्ट आहे. या मुद्द्यावर केंद्रातील सभागृहात याआधीही समर्थक आणि विरोधकांमध्ये वाद झाल्याचे स्पष्ट झाले आहे. काही काळापूर्वी लेखक जावेद अख्तर यांच्यासारख्या मंडळींनी केंद्रीय सभागृहात भारत माता की जय या घोषणेचे जोरदार समर्थन केले होते. या घोषणेला विरोध करणाऱ्या कडव्या स्व-धर्मवाद्यांसोबतच या मुद्द्याचे राजकारण करणाऱ्या सत्ताधार्यांनाही त्यांनी खडे बोल सुनावले होते. भारत माता की जय या ओळींमध्ये या देशाला माता अर्थात आई संबोधून तिच्या विजयाची घोषणा करण्यात काही गैर नसल्याचे त्यांचे म्हणणे होते. या विधानाचा शब्दार्थ लक्षात घेतल्यास त्याला वस्तुतः विरोध करण्याचे काही कारण नव्हते. परंतु त्यावरूनही देशातील दोन कट्टरवादी गटांमध्ये गैरसमज निर्माण करून विरोधाचे राजकारण धार्मिक ध्रुवीकरणासाठी खेळले गेले होते. आता वंदे मातरमच्या मुद्द्यावरूनही तसेच होत आहे. वंदे मातरम या घोषणेत भारत मातेला वंदन असा अर्थ काढल्यास तसेच वंदनेचा एका अथार्ने पूजा उपासना किंवा इबादत किंवा सजदा असा इस्लाममधील मूळ अरबी शब्दांचा अर्थ घेतल्यास एकाच परमेश्वराची उपासना त्यासमोरच नतमस्तक होणार्या विचारसरणीसाठी अशी वंदे मातरमची घोषणा अडचणीची होऊ शकते. हे केंद्रातील सत्ताधार्यांना पुरते ज्ञात आहे. यातून देशातील मुस्लिमांची कोंडी करण्याचा हा सत्ताधारी विचारसरणीचा प्रयत्न असावा. तर कडव्या मुस्लीम विचारसरणीनेही वंदन या शब्दाचा अर्थ सजदा असा घेतल्यास त्यातून दोन्हीकडील परस्पविरोधी धर्मवादी राजकारणाला बळच मिळेल, हे स्पष्ट आहे. वंदे मातरमला राष्ट्रगीत समकक्ष दर्जा मिळाल्यास इतर धर्मवाद्यांनाही वंदे मातरम कायद्यानुसार बोलावेच लागेल, असा बळजबरी प्रयत्न केंद्राचा आहे. बरं जी मंडळी आज वंदे मातरमची एवढी भलामण करत आहेत, त्यांचे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाच्या मुद्द्यावर वारंवार ऐतिहासिक तथ्यांद्वारे आक्षेप घेतले गेले आहेत. आम्ही सांगू तोच धर्म, तीच उपासना, तेच राष्ट्रप्रेम, तीच देशनिष्ठा अशी प्रमाणपत्रे वाटण्याचे अधिकार सत्ताधार्यांना कोणी दिले आहेत? सत्ता म्हणजे देश, राष्ट्र आणि धर्म आणि संविधानही नव्हे, हे या मंडळींना सांगण्याची गरज आहे. देशातील नागरिकांना प्रतीके, संबोधने, वक्तव्ये, गीतांच्या भावनिक राजकारणात अडकवून ठेवण्यापेक्षा त्यांच्या विवंचना आणि त्यांचे जगणे सुसह्य करण्याठी बरेच काही करता येऊ शकते, ज्यासाठी सत्ताधार्यांना नागरिकांनी निवडून दिले आहे. देशातील नागरिकांना अर्थात भारत मातेच्या मुलांना अडचणीत, दुःखात ठेवून स्वतःच्या नावाचा जयजयकार करणे किंवा स्वतःला वंदन करवून घेणे भारतमातेलाही पटणारे नाही. अगर इस देश मे रहना होगा, तो वंदेमातरम कहना होगा, ही हिंदुत्ववादी विचारसरणीच्या लोकांची घोषणा तर प्रसिद्धच आहेच. त्याचा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळीही वापर करण्यात आला. आता सत्तेचा प्रभाव वाढल्यामुळे काहीही करून वंदेमातरम मुसलमानांना बोलायला भाग पाडण्याइतपत त्याचा जोश राहू नये. त्याचा अधिक व्यापक विचार करून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात जे शहीद झाले त्यात अनेक मुसलमान क्रांतिकारक होते, त्यांचाही विसर पडू देता कामा नये.

बदलत्या युद्धतंत्राचे धडे



पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यांनंतर भारताने पाकिस्तानविरोधात हाती घेतलेल्या ह्यऑपरेशन सिंदूरह्ण या मोहिमेस नुकतेच वर्ष झाले. त्याच वेळी पाकिस्तानला हवाई कारवायांबाबत प्रत्यक्ष तांत्रिक सहकार्य पुरविल्याची कबुली चिनी तज्ज्ञांनी दिली आहे. यापुढे पाकिस्तानकडून होणाऱ्या कोणत्याही आगळीकीत चीन, तुर्कीये अशा देशांचा असा प्रत्यक्ष सहभाग नक्कीच असू शकतो. अमेरिकेने भारताशी अधिक सख्य असतानाही दहशतवादविरोधी लढ्याचे कारण देत पाकिस्तानला लष्करी मदत पुरविलेली आहे. बालाकोट संघषार्वेळी ह्यएफ १६ह्णचा भारताविरोधी गैरवापर सिद्ध होऊनही अमेरिकेने ते नजरेआडच केले होते. त्यामुळे अमेरिकेचीही पाकला मदत होतच राहील.

ऑपरेशन सिंदूरमध्ये युद्धनीतीमध्ये काय फरक पडला? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पायदळाच्या तुकड्या न हलवता तंत्रज्ञानाच्या म्हणजे वैमानिकरहित अस्त्रांच्या बळावर युद्ध खेळले गेले. अर्थात, ड्रोनद्वारे युद्ध सुरू असतानाही काश्मीर सीमेलगत तोफांचा मारा सुरू होताच. सुदैवाने भारताने कॅमिकॅझे ड्रोन, लॉयटरिंग म्युनिशन्स या हमखास लक्ष्य टिपणाऱ्या ड्रोनची सुसज्जता बाळगली होती. त्याचप्रमाणे एस ४००, आकाश , ह्य आकाशतीर ही हवाई हल्ला निकामी करणारी यंत्रणाही आपल्याकडे होती. ब्रह्मोसचा साठा दिमतीला होता. या सर्व गोष्टींना सिग्नल्स आणि कम्युनिकेशन्स विभागांचे मोठे बळ लागते. या सर्व गोष्टींसाठी खासगी उद्योगांकडून मोठ्या प्रमाणात व जलदगतीने ड्रोन्स, आदींचे उत्पादन गरजेचे ठरते. त्याचबरोबर लष्कर, हवाई दल आणि भूदल या तिन्ही दलांचा समन्वय अत्यंत निकडीचा होता. आजपर्यंत कधीही नव्हे एवढी या तिन्ही दलांची सुसूत्रता व समन्वय आपण साधू शकलो. त्यालाच अनुसरून नुकतीच नव्या संरक्षण दलप्रमुखांची (सीडीएस) घोषणा आपण केली. जनरल बिपीन रावत यांच्या अपघाती मृत्यूनंतर नव्या सीडीएस नियुक्तीमध्ये बराच विलंब झाला होता. ती चूक आपल्याला उमगली आहे. थिएटर कमांडच्या दृष्टीने ही वाटचाल क्रमप्राप्त आहे.

बालाकोट हल्ल्यावेळी भारताने आपण आक्रमकपणे काय करू शकतो, त्याची चुणूक दाखवली होती. मात्र, आता ८८ तास चाललेल्या धाडसी मोहिमेत प्रथमच पाकिस्तानच्या अंतर्गत भागातील नऊ दहशतवादी तळांवर, हवाई तळांवर अचूक प्रहार करून त्यांच्या हवाई बळाचेच पेकाट मोडण्याचे धाष्टर्य आपण दाखवले. यापुढे पाकच्या भूमीवर हल्ले करण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नाही व अण्वस्त्रांचे ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही, हा सज्जड संदेश त्यातून गेला. आजवर हवाई हल्ल्यांचे पाऊल हे केवळ निर्णायक टप्प्यांवर वापरले जायचे; त्याऐवजी आता ड्रोन्स, दूरस्थ संचालित क्षेपणास्त्रे हा प्रथम प्रहाराचा टप्पा ठरू शकतो. युद्धात भारताचीही हानी झाली असणारच. आपल्या लढाऊ विमानांची हानी नेमकी कशा प्रकारे झाली, याबाबतचे सत्य अजून गुलदस्तात आहे. याबाबतीत आजवर कुणीच थेट पुरावेही सादर केलेले नाहीत. सीडीएसनी सिंगापूरमध्ये केलेल्या वक्तव्यातून संभ्रमच अधिक वाढला. सुस्पष्टता काही आली नाही. मतप्रदर्शन व आंतरराष्ट्रीय स्तरावर मानस तयार करण्यात आपण कमी पडलो, अशीही खंत व्यक्त केली जाते. कारगिल युद्धामध्ये प्रसिद्धीमाध्यमांचे महत्त्व सैन्यदलांना उमगले; परंतु हे दुधारी शस्त्र असते. सिंदूरच्या वेळी सैन्यदलांनी दिवसाच्या काळात प्रेस ब्रीफिंग केली. मात्र, सायंकाळनंतर बातम्या, अफवांचा वेग वाढतो. त्या काळात अधिकृत ब्रीफिंगची उणीव होती. ह्यऑपरेशन सिंदूरह्णनंतरही किनारी भाग, शहरी संवेदनशील भाग येथे अष्टौप्रहर सजगतेची आजही गरज आहे. ऑपरेशन सिंदूरच्या काळात आपल्या शेअर बाजारातील प्रणालींवर हजारो सायबरहल्ले सुरू होते व आपला आर्थिक कणा मोडण्याचेही प्रयत्न सुरू होते. एका ऑपरेशनने दहशतवादाचा धोका निवळणार नाही. या घटनांवरून बोध घेत सुसज्ज राहण्यावाचून पर्याय नाही.

एकला चलो ना रे...



समस्त भारतीयांना अभिमान वाटावा असे प्रतिभावंत कवी, तत्त्वज्ञ रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंती दिनाचा मुहूर्त साधून शनिवारी पश्चिम बंगालमध्ये शुभेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तब्बल ३४ वर्षांचा, डाव्या पक्षांचा पश्चिम बंगालमधील सत्तेचा अभेद्य गड तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी उद्ध्वस्त करतील, असे सन २०११मध्ये किती जणांना वाटले होते? आणि आत्ता, त्याच ममता बॅनर्जी यांची मुख्यमंत्रिपदाची खुर्ची भारतीय जनता पक्ष खेचून घेईल, असे तरी किती जणांना वाटले होते?

एकेकाळी भाजपचे श्रेष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या मंत्रिमंडळात रेल्वे खाते भूषविणाऱ्या ममता बॅनर्जी या नंतर भाजपशी उभा दावा मांडतील, असे किती जणांना वाटले होते? आणि ज्या शुभेंदू अधिकारी यांच्यावर आपण भ्रष्टाचाराच्या आरोपांची राळ उठवली होती तेच शुभेंदू आपल्याच पक्षाचा झेंडा हातात घेऊन मुख्यमंत्री होतील, असे तरी भाजपमधील किती जणांना वाटले होते? यातील पहिल्या दोन प्रश्नांच्या उत्तरांवर मतभेद होतील; तर पुढचे दोन प्रश्न अनेकांस ह्यबावळटह्ण वाटू शकतील, हे आजचे राजकीय वास्तव. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि हजारो भाजप कार्यकर्त्यांची उपस्थिती, हा विजय भाजपसाठी किती महत्त्वाचा आहे, हे दर्शवतो. या सगळ्याकडे उपरोल्लेखित राजकीय वास्तवाच्या पार्श्वभूमीवर पाहायला हवे.

पश्चिम बंगालच्या भोवतालच्या टापूत कमळाचे भरघोस पीक येत असताना वंगभूमीत मात्र पक्षाला अपेक्षित यश मिळत नव्हते. अत्यंत आक्रमक ममता बॅनर्जी हे त्यामागचे कारण. तरीही भाजपने हार न मानता ममतांशी कडवा संघर्ष सुरू ठेवला. दहा वर्षांच्या कालावधीत एक आकडी आमदारसंख्येवरून २०७वर घेतलेली हनुमानउडी हे त्या संघषार्चे घसघशीत यशोफल. त्यास निवडणूक आयोग, अन्य केंद्रीय यंत्रणा यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हातभार नाही, असे कुणीही सुज्ञ व्यक्ती म्हणणार नाही! त्याच वेळी, धार्मिक ध्रुवीकरणाचे प्रयत्न भाजपने केले असे म्हणावे, तर त्यासाठीची सुपीक जमीन खुद्द बॅनर्जी यांनीच तयार केली, हे कसे नाकारणार? बांगलादेशी घुसखोरांबाबत ममतांची भूमिका ही कुंपणावरच्या मतदारांना आपसूकपणे भाजपच्या टापूत ढकलणारी ठरली, हेही कसे नाकारणार? अर्थात, आता हा इतिहास झाला. निकालाआधीचे वाद, निकालानंतरची रक्तरंजित हिंसा हा देखील इतिहास झाला. वर्तमान अगदी स्पष्ट, स्वच्छ आहे : भाजपचे शुभेंदू अधिकारी हे आता पश्चिम बंगालचे सर्वोच्च ह्यअधिकारीह्ण झालेले आहेत. त्यामुळे आता चर्चा करायला हवी ती या वर्तमानाची नि भविष्याची.

शुभेंदू हे एकेकाळचे ममतांचे विश्वासू सहकारी. ममतांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांची तृणमूलमध्ये सद्दी वाढू लागल्यानंतर त्यांनी भाजपची कास धरली हे सर्वश्रुतच. विचारांशी निष्ठा वगैरेबाबत न बोललेलेच बरे, अशी आजची स्थिती. मुळात, सामान्यांचे पोट डाव्या विचारांनी भरत नाही, सेक्युलर विचारांनी भरत नाही आणि हिंदुत्ववादी विचारांनीही भरत नाही.

पोट भरण्यासाठी लागते रोजगार निर्मिती, उद्योग उभारणी आणि सोबतीला सामाजिक शांतता, सौहार्द. सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असे हे राज्य सध्या आर्थिक कुंठितावस्था सोसत आहे. तेथील उद्योगक्षेत्रात नवे प्राण फुंकणे नितांत गरजेचे झालेले आहे. त्यासाठी खासगी गुंतवणूक अधिकाधिक कशी आकर्षित करता येईल, हे पाहावे लागणार आहे. त्यामुळे एकेकाळी सिंगूर, नंदिग्राम येथील उद्योगांबाबत घेतलेली भूमिका शुभेंदू यांनी अर्थातच गंगेत सोडून दिलेली असणार, ही अपेक्षा! सार्वजनिक वाहतूक, घरबांधणी या क्षेत्रांत देखील राज्याने फार मोठे दिवे लावलेले आहेत, असे नाही. मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्यापुढे ही तातडीची प्रमुख आव्हाने असतील. ममतांच्या काळात गुन्हेगारी, खंडणीखोरी वाढल्याचे व त्यात सत्ताधारीच सहभागी असल्याचे अतोनात आरोप झाले. ही विकृत संस्कृती त्यांना कठोरपणे मोडून काढावी लागेल. विकासाची गंगा केवळ शहरांच्याच ओंजळीत पडणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल. त्याचबरोबर मोलाचे असेल ते सगळ्यांना सोबत घेऊन पुढे जाणे. निवडणुकांच्या निमित्ताने उफाळलेली राजकीय आणि धार्मिक कटुता शमवणे यांस त्यांना प्राधान्यक्रम द्यावा लागेल. आपल्या एका प्रख्यात कवितेत, वेगळ्या संदर्भात रवींद्रनाथांनी, ह्यएकला चलो रेह्ण अशी हाक दिली होती. मात्र, शुभेंदू अधिकारी नि भाजप यांच्यासाठीची ताजी हाक ह्यएकला चलो ना रे...ह्ण अशी आहे; ती ते ऐकतील, ही आशा.

दूरदर्शी उद्योगपती



ज्येष्ठ उद्योगपती रवी पंडित यांच्या निधनाने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पुण्याचे नाव मोठे करणाऱ्या सुरुवातीच्या आघाडीच्या उद्योजकांतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. फोर्ब्ज नियतकालिकाच्या अब्जाधीशांच्या यादीत मान पटकावणाऱ्या मोजक्या मराठी उद्योगपतींमध्ये पंडित यांचा समावेश होता. काळाची पावले ओळखून, नव्या क्षेत्रांत गुंतवणूक करून यशाचे इमले बांधणे सर्वांनाच साधते असे नाही. पंडित यांनी ते साध्य करून दाखवले होते. अस्सल पुणेकर असलेले पंडित यांचे प्राथमिक शिक्षण पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी बीएमसीसीतून पूर्ण केले. त्यांच्या वडिलांची कीर्तने-पंडित ही प्रसिद्ध सीए फर्म होती. रवी यांनी सुवर्णपदकासह सीए पदवी प्राप्त केली होती आणि वडिलांच्या व्यवसायात दहा वर्षे काम केले. मात्र, नव्वदच्या दशकात भारतात आलेल्या आर्थिक उदारीकरणाची आणि माहिती तंत्रज्ञानासारख्या (आयटी) तेव्हा नव्या असलेल्या क्षेत्राची क्षितिजे दूरदर्शी रवी पंडितांना खुणावत होती. त्यांनी सहकारी सीए किशोर पाटील यांच्यासह केपीआयटी कंपनी स्थापन केली. सुरुवातीला ती केपीआयटी कमिन्स म्हणून ओळखली जात होती. पुण्यात १९९५ च्या आसपास हिंजवडी येथे राजीव गांधी आयटी पार्कची स्थापना करण्यात आली. त्या ठिकाणी अगदी सुरुवातीपासून असलेल्या कंपन्यांमध्ये केपीआयटी चा समावेश होता. आघाडीच्या वाहननिर्मिती कंपन्यांना सॉफ्टवेअर सोल्युशन्स पुरवण्यात ही कंपनी अग्रेसर असते. कंपनीचा विस्तार १५ देशांत झाला असून, प्रामुख्याने अमेरिका, युरोप व आशियात तिचे ग्राहक पसरलेले आहेत. पंडित यांनी पुणे शहराशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. ज्ञानप्रबोधिनी, भारतीय विद्या भवन, पुणे इंटरनॅशनल सेंटर अशा अनेक महत्त्वाच्या संस्थांवर ते कार्यरत असत. पंडित यांची पर्यावरणप्रेम सर्वश्रुत होते. अगदी अलीकडे ते प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल झाले होते. शस्त्रक्रियेनंतरही त्यांची प्रकृती सावरू शकली नाही आणि शुक्रवारी त्यांची प्राणज्योत मालवली. रवी पंडित यांना श्रद्धांजली!

सगुण-निर्गुण: अक्का...

नदीकाठच्या यात्रा मनात भावलहरी निर्माण करतात. मन भक्ती बिंदूंची जुळवणी करत राहतं. पावलं चालत राहतात. दहाव्या शतकाच्या शेवटी पहिलं ज्ञात मराठी वाक्य लिहिलेला शिलालेख श्रवणबेळगोळला भगवान बाहुबलींच्या पायथ्याशी लिहिला जातो. जैन धर्मीयांची ही महापवित्र भूमी. कर्नाटकाचा आपल्याशी असलेला कानडा अनुबंध आठवतो. त्यावरून विठ्ठल. मग ज्ञानोबा माउली . मग तेरावं शतक आठवतं. माउलींचं समाधीसमयी वय एकवीस. बारावं शतक. महात्मा बसवेश्वर ांच्या क्रांतिकारी विचारांची रुजवण होते. ते सांगतात कष्ट हाच ईश्वर. पहिली धर्मसंसद उभारली जाते बसवकल्याणला. तिथे अनुभव मंडपात महात्मा बसवेश्वर आणि संत अल्लम प्रभू असतात. वचन साहित्याच्या भरभराटीचा हा काळ. सामाजिक समतेचा संदेश देणारी, साध्या सोप्या कन्नड भाषेतील वचनं. तिथे अफाट अध्यात्मिक शक्ती असलेली एक संत कवयित्री येते. केवळ केशसंभाराने देह झाकलेला. अल्लमप्रभूंशी संवाद होतो. कसोटी असते भक्ती आणि ज्ञानाची. अनुभव मंडपात तिच्या ज्ञानसाधनेनं सर्वजण दिपून जातात. बसवण्णा, अल्लमप्रभू तिला आदरानं म्हणतात अक्का. अक्का म्हणजे मोठी बहीण. ही आपली पहिली कवयित्री. संत कवयित्री. अक्कमहादेवी. भक्ती तर अशी की भगवान शंकरालाच मनोमन पती मानलेलं. राजा भक्तीत अडथळा आणतो म्हणून त्याच्याशी विभक्त होऊन आध्यात्मिक प्रवासाला निघालेली ही बंडखोर कवयित्री. वैराग्य निवडते. श्रीशैलमच्या कदली वनात तपश्चर्या करतात आणि वयाच्या पंचविसाव्या वर्षी समाधी घेतात. भक्तिबिंदूंची जुळवणी मनात अशी होते. बारावं शतक. अक्कमहादेवी. समाधी वयाच्या पंचविसाव्या वर्षी. तेरावं शतक. ज्ञानोबा माऊली. समाधी वयाच्या एकविसाव्या वर्षी. मुक्ताई लहान आणि अक्का मोठी. आणखी एक योगायोग. शरण परंपरेत देखील एक संत होत्या मुक्ताक्का. पावलं चालत राहतात. मन शतकांचा प्रवास करतं. बाराव्या शतकात सहनशीलता आणि स्थितप्रज्ञता शिकवणारी मोठी बहीण... अक्का आठवत राहते.

वृत्तपत्रात खाद्यपदार्थ पॅक करणे आरोग्यासाठी घातक



जेव्हा आपण स्ट्रीट फूड खायला जातो तेव्हा अनेक विक्रेते आपल्याला वर्तमानपत्रात ते पॅक करुन देतात. वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ पॅक करणे ही एक सामान्य गोष्ट आहे. आपण सर्वांनी कधी ना कधी हे बघितले असेल किंवा असे केलेदेखील असेल. पण तुम्हाला माहित आहे का की वृत्तपत्रात साठवलेले अन्न खाल्ल्याने तुम्ही कर्करोगासारख्या अनेक गंभीर आजारांना बळी पडू शकता. होय भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणने अलीकडेच एक सूचना जारी केली आहे ज्यानुसार वृत्तपत्रात खाद्यपदार्थ पॅकिंग, सर्व्ह करणे किंवा साठवणे आरोग्यास गंभीर हानी पोहोचवू शकते. ऋरअक ने सर्व खाद्य विक्रेत्यांना असे न करण्याचा सल्ला दिला आहे. चला तर मग जाणून घेऊया वर्तमानपत्रात दिलेले किंवा पॅक केलेले अन्न खाल्ल्याने आरोग्याला कोणते नुकसान होऊ शकते.

वृत्तपत्राची शाई आरोग्यासाठी घातक आहे : ऋरअक चे उएड ऋ कमलवर्धन राव म्हणाले की वर्तमानपत्र छापण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या शाईमध्ये शिसे आणि जड धातूंसह अनेक प्रकारची रसायने असतात, जे अन्न प्रदूषित करतात. त्याच वेळी, वर्तमानपत्रांचे वितरण केव्हा केले जाते, ते कुठे आणि कसे ठेवले जाते, या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान वृत्तपत्रे अनेक जीवाणू आणि विषाणूंच्या संपर्कात येऊ शकतात. जे वर्तमानपत्रांद्वारे आणि नंतर अन्नाद्वारे आपल्या शरीरात पोहोचू शकते. ज्याचा आपल्या आरोग्यावर परिणाम होऊन आपण आजारी पडू शकतो.

हे आरोग्यासाठी हानिकारक आहेत : ऋरअक च्या सूचनेनुसार, वर्तमानपत्र छापण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या शाईमध्ये अनेक धोकादायक रसायने असतात, जी अन्नासोबत आपल्या शरीरात प्रवेश करून अनेक धोकादायक आजारांना कारणीभूत ठरू शकतात. जर तुम्ही वृत्तपत्रात गुंडाळलेले अन्न जास्त दिवस खात असाल तर कॅन्सरसारख्या घातक आजाराचा धोकाही वाढतो. जर तुम्ही तेलात तळलेल्या वस्तू वर्तमानपत्रावर ठेवून खातात तर त्याची शाई तेलात अडकून शरीरात जाते, ज्यामुळे तुम्हाला पचनाशी संबंधित अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. याशिवाय वृत्तपत्रात गुंडाळल्यामुळे अन्नाचा दर्जाही खराब होतो ज्याचा परिणाम आपल्या रोगप्रतिकारक शक्तीवरही होतो.

फूड पॅकिंगच्या दुसऱ्या पद्धती : अन्न पॅक करण्यासाठी सुती कापड वापरावे. यामुळे तुमचे अन्न गरम राहते आणि त्यामुळे विविध आजारांपासून तुमचे संरक्षण होऊ शकते. बटर पेपर, ज्याला रॅपिंग पेपर किंवा सँडविच पेपर देखील म्हणतात, अन्न पॅकिंगसाठी ॲल्युमिनियम फॉइलपेक्षा चांगला पर्याय आहे. याशिवाय, तुम्ही सिलिकॉन कंटेनर वापरू शकता, जे अन्न दीर्घकाळ ताजे ठेवते.

एकमेकांना भेटल्याने मुलांचा विकास होतो



अनेक मुले स्वभावाने लाजाळू असतात आणि बाहेरील जगापासून दूर राहतात. अनेक मुलं मोबाईल आणि लॅपटॉपलाच आपलं जग मानतात आणि त्यांना त्यांच्या शेजाऱ्याचं नावही माहीत नाही. मोबाईलच्या माध्यमातून आपण संपूर्ण जगाशी सामाजिक आहोत असे त्यांना वाटते. जेव्हा मुले मित्र बनवू शकत नाहीत किंवा समाजात अडचणी येतात तेव्हा पालकांसाठी हे एक आव्हान असू शकते. अभ्यास आणि खेळासोबतच मुलांना सामाजिक संस्कार देणेही गरजेचे आहे. ते गप्प राहिल्यास त्यांचा विकास खुंटतो. पण सामाजिक संवादामुळे त्यांची प्रेरणा वाढते, त्यांचे धैर्य वाढते आणि त्यांना नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते.मुलांइतकेच पालकही त्यांची मुले सामाजिक नसण्यासाठी जबाबदार असतात, कारण विभक्त कुटुंबात पालकांना मुलांसाठी वेळ नसतो, ते स्वतः मुलांसोबत वेळ घालवतात. सामाजिक नसतात. दुसरीकडे, मोबाईल फोनने मुलांना अक्षरशः सामाजिक बनवले, परंतु त्यांना त्यांच्या प्रियजनांपासून दूर ठेवले. पालकांनी आपल्या मुलांसाठी आठवड्यातून एक दिवस काढणे आणि त्यांना बाहेरील जगासमोर आणणे महत्वाचे आहे. यामुळे त्यांची नातेसंबंधांची समज वाढेल आणि ते सामाजिक बनतील. अनेक मुले त्यांच्या आजूबाजूला काय चालले आहे याबद्दल आधीच सामाजिक असतात. त्याला लोकांना भेटायला आवडते. नातेवाईक घरी येताच अनेक मुले खोलीत जातात. अशा परिस्थितीत, पालकांनी त्यांना सामाजिक कार्यात सामील केले पाहिजे, जसे की त्यांना पाण्याचा ग्लास आणायला सांगणे किंवा मोठ्यांना नमस्कार करायला शिकवणे, जेणेकरून त्यांना त्यांच्या आजूबाजूला काय चालले आहे ते कळेल. सामाजिक राहून, मुले स्वतःला मोकळेपणाने व्यक्त करण्यास सक्षम असतात, ज्यामुळे त्यांच्या सभोवतालचे लोक त्यांच्यासोबत नेहमी आनंदी असतात.

- **नवीन लोकांशी संवाद साधणे :** अनेक मुले त्यांच्या पालकांशिवाय किंवा जवळच्या लोकांशिवाय इतर कोणाशीही बोलत नाहीत. अशा परिस्थितीत ते अंतर्मुख राहतात आणि बाहेरील जगाशी संपर्क साधू शकत नाहीत. आजच्या काळात मुलांनी कृतीशील आणि संवादी असणं खूप गरजेचं आहे. त्यामुळे पालकांनो, मुलांना बोलायला शिकवा. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि एकटेपणा दूर होईल. मुलांना मित्र बनवायला आणि इतर लोकांसमोर मोकळे व्हायला शिकवा. यासाठी त्यांना सांस्कृतिक, क्रीडा, धार्मिक आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करा.
- **शेअरिंग-केअरिंग :** मुलांची मने कोरी आणि साधीही असतात, पण अनेक मुलांमध्ये शेअरिंग-केअरिंगचा स्वभाव नसतो. अशा परिस्थितीत पालकांनी त्यांना मित्रांमध्ये सामायिक करणे आणि काळजी घेणे शिकवले पाहिजे. मित्रांना वाईट काळात मदत केल्याने मुलांमध्ये सहकार्याची आणि सद्भावनाची भावना निर्माण होईल. मुलांना मैत्रीच्या प्रेरणादायी कथा सांगा.
- **प्रश्न करणे :** हे ऐकणारी अनेक मुलं शांतपणे आत घेतात. पण त्यांनी प्रश्न विचारले नाहीत तर त्यांचा विकास थांबेल. त्यामुळे पालकांनो, मुलांना प्रश्न करायला शिकवा. यामुळे त्यांच्यामध्ये कुतूहल निर्माण होईल आणि ते नवीन गोष्टी जाणून घेऊ शकतील आणि कोणत्याही स्पर्धेत भाग घेऊ शकतील.
- **ताकद ओळखा :** प्रत्येक मुलामध्ये एक विशेष गुणवत्ता असते. हीच त्याची ताकद आहे. त्यामुळे मुलांवर काहीही करायला भाग पाडू नका. त्यांची प्रतिभा समजून घेऊन आणि मुलांची बलस्थाने काय आहेत हे जाणून घेऊनच पुढे जा. पालक मुलाचे गुण ओळखतात.
- **रोल मॉडेल व्हा :** प्रथम मुलांसाठी रोल मॉडेल व्हा . पालकांनी कामाव्यतिरिक्त वेळ काढावा, मुलांसोबत बसावे, सामाजिक राहावे, जेणेकरून मुले त्यांच्याकडे पाहून हे सर्व गुण शिकतील.

बोधकथा

जे इतरांना देऊ ते परत येणार

एका गावात एक शेतकरी राहत होता तो दुधापासून लोणी, दही बनवून विकायचा. एके दिवशी त्याच्या पत्नीने लोणी तयार करून त्याला दिले. तो ते लोणी घेऊन शहराकडे विकायला निघाला.ते लोणी पेढ्याच्या आकाराचे होते आणि प्रत्येकी त्या लोण्याच्या पेढ्याचे वजन १ किलो होते. शहरात जाऊन शेतकरी ते लोणी नेहमीप्रमाणे एका दुकानदाराला विकायचा, आणि त्या दुकानदाराकडून चहापत्ती, साखर, तेल, साबू असं सामान विकत घेऊन आपल्या गावी परतायचा. तो शेतकरी गेल्यावर दुकानदाराने ते लोणी फ्रिजमध्ये ठेवण्यास सुरु केले. त्याने विचार केला की या लोण्याच्या पेढ्यांचे वजन करून बघावं.त्याने वजन केल्यावर लोण्याच्या पेढ्यांचं वजन ९०० ग्रॅम निघालं.त्याने सर्व पेढ्यांचं वजन केल्यावर ते सर्व पेढे ९००-९०० ग्रामाचे निघाले. पुढच्या आठवड्यात शेतकरी नेहमीप्रमाणे त्या दुकानदाराच्या दुकानावर लोण्याचे पेढे देण्यासाठी आला.त्याला बघून तो दुकानदार फार चिडला आणि रागात म्हणाला, निघून जा इथून, मला फसवतो, बेईमानी चा व्यवसाय करतो. मला तुज्याशी कोणताही व्यवहार करायचा नाही.चालता हो इथून. ९०० ग्रॅम लोण्याच्या गोळ्याला १ किलो म्हणून विकणाऱ्या बेइमानाचे तोंड देखील मला बघायचे नाही. शेतकऱ्याने अगदी नम्रतेने उत्तर दिले की "भाऊ आम्ही गरीब माणसे आमच्या कडे कुठे मालाला तोलण्यासाठी वजन माप नाही. आपण जे साखर देता त्यालाच वजन म्हणून एका तराजूत ठेऊन वजन घेतो आणि आपल्याकडे घेऊन येतो." हे ऐकून दुकानदाराला आपल्या केलेल्या कृत्याची लाज वाटली. या पुढे त्याने नेहमी प्रामाणिकपणे व्यवसाय करण्याचा विचार केला.

तात्पर्य : आपण जे इतरांना द्याल आपल्याकडे ते परत येणार. मग ते मान असो, आदर असो, किंवा धोका.

रेसिपी

फ्रुट सलाड

'फ्रुट सलाड'साठी लागणारा साहीत्य:

- १ मध्यम केळं
- १ लहान सफरचंद
- १ मध्यम संत्र
- १/२ कप द्राक्षं
- १/२ कप पिकलेल्या पपईचे मध्यम तुकडे
- **ड्राय फ्रुट्स :** २ टेस्पून बदामाचे काप, १ टेस्पून पिस्त्याचे काप, २ टेस्पून बेदाणे, १ टेस्पून काजू
- १/२ कप कंडेंन्स मिल्क
- १/२ कप दूध

'फ्रुट सलाड'साठी लागणारा कृती:

◆ फळांची तयारी ◆

द्राक्षं : द्राक्षांचा आकार लहान असेल तर अख्खी द्राक्षं वापरावी. मोठी द्राक्षं असतील तर प्रत्येकाचे दोन भाग करून घ्यावे.

संत्र : संत्र्याचे साल काढून आतील फोडी विलग कराव्यात. प्रत्येक फोड सोलून घ्यावी आणि आतील गर फक्त वापरावा.

पपई : पपई सोलून आतील बिया फेकून द्याव्यात. पपईचे मध्यम तुकडे करावे.

केळं : केळं सोलून त्याच्या मध्यम आकाराच्या फोडी कराव्यात.


सफरचंद : नेहमी सफरचंद शेवटी कापावे म्हणजे काळे पडत नाही. सफरचंदातील बिया काढून टाकाव्यात आणि सफरचंदाचे बारीक किंवा मध्यम तुकडे करावेत.

- सर्व फळं एकत्र करावीत. त्यात कंडेंन्स मिल्क आणि साधे दुध घालून मिक्स करावे. [दूध आणि कंडेंन्स मिल्कचे प्रमाण कमी-जास्त होवू शकते. म्हणून आधी १/४ कप दूध आणि १/४ कप कंडेंन्स मिल्क एकत्र करून फळांमध्ये घालावे. मिक्स करून चव पाहावी. जर गोडपणा बरोबर असेल पण फ्रुट सलाड जास्त घट्ट झाले असेल तर थोडे साधे दुध घालावे.]
- ड्रायफ्रुट्स घालून मिक्स करावे. (थोडे बेदाणे, पिस्ता, बदाम सजावटीसाठी ठेवावे)
- फ्रिजमध्ये गार करून जेवणानंतर किंवा जेवणाबरोबर सर्व्ह करावे.

टीप : आवडीनुसार तसेच अव्हेलेबल असल्यास चिकू, डाळींब, स्ट्रॉबेरी, हापूस आंबा, पेरू (कमी बियांचे) इत्यादींचे लहान तुकडे फ्रुट सलाडमध्ये घालू शकतो. (तसेच इतर आंबटगोड किंवा फक्त गोड रसाळ अशी फळे वापरता येतील)



सायलेन्ट हार्ट अटॅकची लक्षणे, दुर्लक्ष केल्यास जीवाला धोका!



अनेक लोकांना वाटतं की, जेव्हा हार्ट अटॅक येईल तेव्हा त्यांच्या छातीत जोरात वेदना होतील आणि त्यांना कळेल की, त्यांना हार्ट अटॅक आलाय. पण अनेकदा हार्ट अटॅक कोणत्याही लक्षणांशिवायही अचानक येत असतो. याला सायलेन्ट हार्ट अटॅक म्हटलं जातं. याआधी तुमच्यात काही लक्षणे दिसतात, ज्यांवर वेळीच लक्ष देऊन उपचार घेतले पाहिजेत.

छातीत प्रेशर

जर तुमच्या छातीत ब्लॉकिज असतील तर तुम्हाला छातीत दबावाची जाणीव होईल. अशात छातीत वेदना आणि प्रेशरही जाणवू शकतं. जर अशी काही लक्षणे दिसत असतील तर तुमच्यासाठी चिंतेची बाब आहे.

हात आणि खांदेदुखी

छातीत कळ येणे आणि खांदा-हाताकडे वेदना हळूहळू वाढत जाणे हार्ट अटॅकचं लक्षण आहे. अशात अनेकदा असंही होतं की, छातीत काही वेदना होत नाहीत. पण खांदे किंवा हातांमध्ये वेदना होते.

अचानक कमजोरी

जर तुम्हाला अचानक चक्कर येत असेल किंवा तुम्हाला नीट उभंही राहता येत नाही अशी कमजोरी वाटत असेल, तर वेळीच आजूबाजूच्या लोकांना याची कल्पना द्या आणि डॉक्टरांना बोलवण्यास सांगा.

जबड्यामध्ये वेदना

नेहमीच जबड्यामध्ये किंवा घशात थंडी आणि सेंन्सिटीव्हिटीमुळे वेदना होतात. पण जर छातीत्या मधोमध वेदना होत असेल आणि हा त्रास हळूहळू जबड्याकडे सरकत असेल तर हे हार्ट अटॅकचं लक्षण असू शकतं.

पाय आणि तळपायावर सूज

जर तुमच्या पायांवर सूज असेल तर याचा अर्थ होतो की, हार्ट योग्यप्रकारे ब्लड पंप करू शकत नाहीये. हार्ट फेलिअरच्या आधी किडनी कमजोर होऊ लागते. ज्यामुळे पायांवर सूज येते. या लक्षणाकडे दुर्लक्ष करून अजिबात चालणार नाही. वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

कथा/ बोधकथा

धाडसी उंदराची कहाणी

फार पूर्वी एका छोट्या गावात जेरी नावाचा उंदीर राहत होता. जेरी दिसायला लहान असेल, पण त्याचे मन मोठे होते आणि तो खूप धाडसी होता. त्याचा आकार असूनही, त्याने नेहमीच साहसी काम करण्याचे आणि इतर प्राण्यांना ते सिद्ध करण्याचे स्वप्न पाहिले आहे. एके दिवशी गावात एक भयंकर मांजर आली, त्यामुळे सर्व प्राणी भीतीने जगू लागले. ते इतके घाबरले होते की ते अन्न गोळा करण्यासाठी घर सोडण्यासही घाबरत होते. अशा परिस्थितीत गावात झपाट्याने संसाधने संपत होती. जेरीला चांगलेच माहीत होते की त्याला त्याचे मित्र आणि घर वाचवण्यासाठी काहीतरी करावे लागेल. तो आता मांजरीला मारण्याची योजना घेऊन येतो आणि स्वतःच्या साहसाला निघतो. त्याला एक चमकदार घंटा सापडली आणि ती त्याच्या शेपटीला बांधली. त्यानंतर मांजर झोपलेली असताना तो तिच्या घरात घुसला आणि त्याने जोरात बेल वाजवली. आवाज ऐकून मांजर घाबरून गेली आणि गावाबाहेर गेली. जेरीच्या या शौर्याने गाव आता इतर प्राण्यांसाठी सुरक्षित झाले होते. जेरीच्या शौर्याने इतर प्राणी चकित झाले आणि त्यांनी त्यांचे घर वाचवल्याबद्दल त्याचे आभार मानले. तेव्हापासून जेरी गावात सर्वात धाडसी उंदीर म्हणून ओळखला जाऊ लागला.

तात्पर्य : धाडस आणि जिद्द असेल तर लहानात लहान प्राणीही मोठा फरक करू शकतो हे ही गोष्टी शिकवते.



पोट दुखत आहे, डोंटवरी हे घरगुती उपाय करून पहा

- दहा ग्रॅम गुळ व अर्धा चमचा खायचा चुना एकत्र करून त्याची एक गोळी तयार करावी. ही गोळी एक ग्लास कोमट पाण्यासोबत घेऊन थोडी झोप घ्यावी. थोड्याच वेळेत पोटदुखीवर आराम पडेल.
- जर पोट फारच जोराने दुखत असेल तर आल्याच्या रसामध्ये मध मिसळून त्याचे सेवन करावे. असे केल्याने पोट दुखणे थांबते.
- अर्धा चमचा हळद आणि अर्धा चमचा मीठ एकत्र करून थंड पाण्यासोबत घेतल्याने पोट दुखणे थांबण्यास मदत होते.
- अर्धा चमचा आल्याचा रस व अर्धा चमचा लिंबाच्या रसामध्ये थोडेसे पादरे मीठ टाकून प्यायल्याने पोट दुखी थांबते.
- बिना दूधाचा चहा (कोरा चहा) प्यायल्यानेदेखील पोट दुखणे थांबते. त्यात थोडा लिंबाचा रस टाकल्यास लवकर असर होतो.
- एक ग्लास कोमट पाण्यात एक चमचा बेकिंग सोडा एकत्र करून प्यायल्याने पोट दुखी लगेच थांबते
- चांगल्या प्रकारे शिजलेले तांदूळ एका कॉटनच्या कपड्यात बांधून शेकल्यास पोट दुखी थांबते.
- एक ग्लास पाण्यामध्ये थोडासा गोड सोडा टाकून प्यायल्याने पोट दुखणे थांबते.
- सुंठ, जीरा आणि काळी मिरी सम प्रमाणात घेवून त्याचे चूर्ण बनवून घ्यावे. गरम पाण्यासोबत एक चमचा हे चुर्ण घेतल्याने पोट दुखणे थांबते.



३ व्यायामप्रकार आठवड्याभरात करतील चमत्कार



तुमचेही पोट सुटले? पण जीमला जाऊन वर्कआऊट करण्यासाठी तुम्हाला फारसा वेळ नाही? पण सुटलेल्या पोटाचे काहीतरी करावे लागेल असे तुम्हाला मनापासून वाटत असेल तर तुम्ही अगदी सोपे ३ व्यायामप्रकार करुन तुमच्या पोटावरील चरबी कमी करु शकता. हे व्यायाम तुम्ही मनापासून केले तर तुम्हाला हवे असलेले ॲब्जही या व्यायामाने मिळू शकतील. मग आता आपण पाहुया हे ३ चमत्कार करणारे व्यायामप्रकार. करुया सुरुवात

क्रंचेस

आता पहिला व्यायामप्रकार तुम्हाला करायचा आहे तो म्हणजे क्रंचेस. हा व्यायाम प्रकार तुम्हाला अगदी सहज कुठेही करता येतो. यासाठी तुम्हाला आवश्यकता आहे ती मॅटची. पाठीवर झोपून तुम्हाला गुडघ्यात पाय दुमडून घ्यायचे आहेत. हात मानेखाली किंवा ९० अंशावर घेऊन तुम्हाला कोणताही आधार न घेता उठायचे आहे. जर तुम्ही अगदीच व्यायाम करणारे नसाल तर तुम्हाला पहिल्यावेळी थोडा त्रास होईल. पण कालांतराने तुम्हाला याची अगदी सवय होईल. पहिल्यांदा तुम्ही १० क्रंचेसपासून व्यायामाला सुरुवात करा. पुढे हा आकडा वाढवा. हा व्यायाम प्रकार करताना तुम्हाला तुमच्या पोटाच्या वरील भागावर ताण आलेला जाणवेल.यामुळे तुमचे पोटाचे स्नायू ताणले जातात. पोटाच्या भागात साचलेली चरबी कमी करण्यास हा व्यायाम प्रकार मदत करतो.

हाफ क्रंचेस

वर जो प्रकार पाहिला तो फुल क्रंचेसमधील होता. असे करताना तुम्ही तुमचे अंग पूर्ण उचलत होता. पण आता तुम्हाला या व्यायामप्रकारात फक्त तुमचे खांदे वर येतील एवढचं शरीर उचलायचे आहे. असे करताना तुमच्या ओटी पोटात तुम्हाला थोडी कळ आलेली जाणवेल. तुमच्या ओटीपोटावरील फॅट कमी करण्यासाठी हा व्यायाम प्रकार मदत करतो. क्रंचेसप्रमाणेच तुम्हाला यामध्ये रिपिटेशन वाढवायचे असतात. म्हणजे सुरुवातीला १० आणि मग नंतर तुम्ही तुमच्या शरीराच्या क्षमतेनुसार हा व्यायाम करु शकता. असे करताना तुमची मान दुखत असेल तर तुम्ही काहीतरी चुकीचं करत आहात.तुम्हाला हा ताण तुमच्या पोटावर येऊ द्यायाचा आहे मानेवर नाही. तुम्ही जर हा व्यायाम प्रकार १५ दिवस करुन पाहिलात तरी तुम्हाला तुमच्यामध्ये झालेला बदल जाणवेल.

लेग रेस

हा व्यायामप्रकार दिसायला आणि करायला सोपा वाटत असला तरी तुम्हाला हा व्यायामप्रकार फारच फायदेशीर आहे. मॅटवर पाठीवर झोपून तुम्हाला तुमचे दोन्ही पाय ९० अंशावर उचलायचे आहेत. पाय खाली आणताना तुम्हाला हळू आणायचा आहे. कारण असे केल्यानंतरच तुम्हाला ओटीपोटात ताण आलेला अगदी सहजपणे जाणवेल. आता या व्यायामाची सुरुवात तुम्हाला १० पासून करायची आहे. त्यानंतर तुम्ही ते वाढवू शकता. ज्यांना व्यायामाला अगदीच वेळ काढता येत नसेल तर अशांनी किमान हे ३ व्यायामप्रकार करायला काहीच हरकत नाही. तुम्ही जर तुमचा डाएट आणि व्यायामाचे सातत्य कायम ठेवले तर तुम्हाला तुमच्या पोटाचा घेर नक्कीच कमी झालेला दिसेल.

मुंबईत पोलिसांची मोठी कारवाई; दोन वेगवेगळ्या गुन्ह्यात 12 जणांना अटक, 16 कोटींचे ड्रग्ज जप्त

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

अँटी नार्कोटिक्स सेलच्या कांदिवली युनिटने अंधेरी पश्चिमेतील वसोर्वा परिसरातील यारी रोडजवळ छापा टाकत मोठी ड्रग्ज कारवाई केली आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी दोन आरोपींकडून 765 ग्रॅम हेरॉईन जप्त केले असून, आंतरराष्ट्रीय बाजारात या अमली पदाथार्ची किंमत सुमारे 3.82 कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे ठाणे जिल्ह्यातील मीरा रोड परिसरात व्यावसायिक स्वरुपात एमडी ड्रग्सची खरेदी-विक्री करणाऱ्या मोठ्या अंमली पदार्थ रॅकेटचा गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-4 ने पदार्फाश केला आहे. या कारवाईत तब्बल 13 कोटी 61 लाख 38 हजार 480 रुपये किंमतीचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले. याप्रकरणात 10 आरोपींना अटक करण्यात आली आहे. कांदिवली ड्रग्स प्रकरणातपोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या प्रकरणात ड्रग्ज पुरवठा साखळीशी संबंधित इतर व्यक्तींचाही शोध घेतला जात आहे.



मिरा रोड प्रकरणी 10 आरोपींना अटक

मिरा रोड प्रकरणात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, 4 एप्रिल 2026 रोजी मिरा रोड पूर्व येथील छेडा आदर्श बिल्डिंग परिसरातील एका घरावर छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान श्रीमती फिरदोस अरबाज कुरेशी यांच्या घरातून 1 किलो 324 ग्रॅम वजनाचा अंदाजे 2 कोटी 66 लाख 17 हजार 280 रुपये किंमतीचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आला. तपासात हा अंमली पदार्थ तिचा पती अरबाज वकील कुरेशी याचा असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम 1985 अंतर्गत कलम 8(क), 21 (क), 22(क) आणि 29 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-4 ने तपासाची सूत्रे हाती घेत मुंबई, मिरा रोड आणि गुजरात येथे धडक कारवाया करत एकामागोमाग एक अशा 10 आरोपींना अटक केली. आरोपींकडून एकूण 6 किलो 773 ग्रॅम वजनाचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आला असून त्याची बाजारातील किंमत 13 कोटींहून अधिक असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच बरोबर एम.डी. ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारी 255 लिटर ची रसायने ही हस्तगत करण्यात आली आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अरबाज कुरेशी, मोईज खान, अरमान राईन, सुनिल यादव, मोहम्मद वसिम शेख, इरफान कुडीया, मोहम्मद अराफत अन्सारी, खालदा अन्सारी आणि आकाश यादव यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपआयुक्त संदीप डोईफोडे आणि सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-४ चे प्रभारी पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख आणि त्यांच्या पथकाने ही धडाकेबाज कारवाई यशस्वी केली.

10 टक्के पाणी कपात आणि पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमधील पाणीसाठ्यात घट झाल्याने हा पाणीसाठा अधिकाधिक काळ उपयोगात यावा याहेतूने खबरदारीचा उपाय तसेच भारतीय हवामान खात्याने पुढील वर्षी येणाऱ्या अल निनो व आयओडी बाबत वर्तवलेला अंदाजानुसार कमी मान्सून प्रमाण लक्षात घेता जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या निदेर्शानुसार मुंबई महानगरात येत्या 15 मे 2026 पासून 10 टक्के पाणीकपात लागू करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. मुंबईकर नागरिकांनी घाबरून जाण्याचे कोणतेही कारण नाही. मात्र सर्व नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे विनम्र आवाहन देखील बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

मुंबईस पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये आजची आकडेवारी लक्षात घेत एकूण 3 लाख 40 हजार 399 दशलक्ष लीटर पाणीसाठा उपलब्ध आहे. वार्षिक 14 लाख 47 हजार 363 दशलक्ष लीटरच्या तुलनेत सध्या 23.52 टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. पाणीसाठ्यावर महानगरपालिका प्रशासनाचे अत्यंत बारकाईने लक्ष असून दररोज नियोजनपूर्वक पाणीपुरवठा केला जात आहे. एवढेच नव्हे तर, भातसा धरणातील निभावणी साठ्यातून 1,47,092 दशलक्ष लीटर तर अप्पर वैतरणा धरणातील निभावणी साठ्यातून 90,000 दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणीसाठा मुंबईला मिळणार आहे. मुंबईसाठी पाणीसाठा उपलब्ध असून मुंबईकर नागरिकांनी घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. अलीकडे वाढलेले तापमान, पर्यायाने वाढणारे बाष्पीभवन आणि पाणीसाठा 10 टक्केपेक्षा कमी झाल्यानंतर यापुढेही पाणीपुरवठा नियोजनपूर्वक करता यावा, या सर्व पैलूंचा विचार करून आणि खबरदारीचा उपाय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने 10 टक्के पाणी कपात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ठाणे, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका व इतर गावांना जो पाणीपुरवठा केला जातो, त्यात देखील 15 मे 2026 पासून 10 टक्के पाणीकपात लागू राहणार आहे. समाधानकारक पर्जन्यमान होऊन जलाशयांमधील उपयुक्त साठ्यामध्ये सुधारणा होईपर्यंत ही पाणी कपात लागू राहणार आहे.




पाण्याचा अपव्यय टाळावा

- दैनंदिन जीवनात पाण्याचा काटकसरीने वापर करणे, त्याचा अपव्यय टाळणे शक्य आहे. यासाठी पाणी बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात.
- आवश्यक तितकेच पाणी पेल्यामध्ये घेवून प्यावे. आंघोळीसाठी शॉवरचा उपयोग न करता बादलीमध्ये पाणी घेवून आंघोळ केल्याने पाण्याची मोठी बचत होते. नळ सुरु ठेवून दात घासणे, दाढी करणे टाळावे.
- घरकामे करताना पाण्याचे नळ वाहते ठेवू नका. त्याऐवजी भांड्यांमध्ये पाणी घेवून कामे उरकावीत.
- वाहने धुण्यासाठी नळी न लावता भांड्यामध्ये पाणी घेवून ओल्या कापडाने वाहने पुसणे सहज शक्य असते. घरातील लादी, गॅलरी, व्हरांडा, जिने आदी धुवून काढण्याऐवजी ओल्या फडक्याने पुसून घ्या. आदल्या दिवसाचे पाणी शिळे समजून फेकू नका.
- वॉशिंग मशीनमध्ये एकाचवेळी शक्य तेवढे कपडे धुतल्यास, मशीनचा पयार्याने पाण्याचा वापर कमी होवू शकतो.
- नळ तसेच वॉश बेसिनचे नळ यांचा प्रवाह मयार्दीत करणारया किंवा तुषार स्वरुपात पाणी प्रवाहित करणारया तोटी (नोझल) बाजारात सहज उपलब्ध असतात. नळांना अशा प्रकारची तोटी लावून पाण्याची तब्बल दोन तृतीयांश बचत करणे शक्य आहे. त्यामुळे नागरिकांनी त्याचप्रमाणे सर्व हॉटेल्स, उपाहारगृहे यांनी त्याचा वापर करावा.
- उपाहारगृहे, हॉटेल्समध्ये ग्राहकांना आवश्यक असेल तेव्हाच पेल्यांमध्ये पाणी द्यावे. अथवा पाण्याची बाटली पुरवावी. जेणेकरुन अकारण पाण्याने भरुन ठेवलेल्या पेल्यांचे पाणी वाया जाणार नाही.
- सर्व घरांमध्ये, गृहनिर्माण संस्थांमध्ये पाण्याची यंत्रणा, वाहिन्या तपासाव्यात. कोठेही गळती आढल्यास तात्काळ दुरुस्ती करुन घ्यावी, यातून पाण्याची बचत देखील होते व पाणी दूषित होत नाही.
- छतावरील पाण्याच्या टाक्या भरताना त्या ओसंडून वाहणार (ओव्हरफ्लो) नाहीत, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.
- ज्या-ज्या ठिकाणी पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो, त्या सर्व व्यावसायिक व वाणिज्यिक आस्थापनांनी देखील पाण्याचा अपव्यय टाळून बचत करता येईल, अशा कार्यपद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे.
- एकूणच, पाणी बचतीच्या उपाययोजना अंगीकारणे सहज शक्य आहे. त्याचा अवलंब करुन मुंबईकरांनी शक्य तितकी पाणीबचत करावी, पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, महानगरपालिका प्रशासनाच्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

यंत्रणेच्या चुकीची शिक्षा जनतेने का भोगावी? न्यायालयाने युआयडीएआयला फटकारले

■मुंबई। प्रतिनिधी,

आधार कार्डाशी संबंधित तांत्रिक त्रुटी आणि बायोमेट्रिक समस्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण अर्थात युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (वक्सअक) ला चांगलेच फटकारले आहे. प्रणालीमध्ये काही त्रुटी असल्यास त्याचे परिणाम सामान्य नागरिकांना भोगावे लागू नयेत. नागरिकांना प्रशासकीय कारणास्तव अधांतरी अवस्थेत सोडून देणे किंवा वेठीस धरणे अयोग्य आहे. त्याऐवजी प्राधिकरणाने आपला दृष्टिकोन बदलून नागरिकांच्या सोयीला प्राधान्य द्यावे. जेणेकरून लोकांना त्यांच्या आधार काडार्तील किरकोळ दुरुस्तीसाठीही न्यायालयाकडे धाव घ्यावी लागणार नाही, असे खडेबोलही उच्च न्यायालयाने सुनावले. आधार



अद्ययावतीकरणाशी संबंधित समस्यांचा सामना करणाया जुळ्या भावांना दिलासा देताना न्यायालयाने हे आदेश दिले. रोहित निकाळजे आणि राहुल निकाळजे या 19 वर्षीय जुळ्या भावांनी मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. लहान असताना 2012 मध्ये त्यांनी आधार कार्ड काढले होते. 2022 मध्ये जेव्हा ते त्यांचे बायोमेट्रिक्स अद्ययावत (अपडेट) करण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना अडचणींचा सामना करावा लागला. त्यांना मदत करण्याऐवजी प्रशासनाने त्यांना चक्रात गुंतवून ठेवले. कधी त्यांना आधार अद्ययावत करण्यास सांगितले, तर कधी आधार कार्ड रद्द केले जाईल असे सांगितले. अधिकार्यांच्या या परस्परविरोधी विधानांमुळे तसेच प्रणालीच्या गुंतागुंतीमुळे दोघा भावांना महाविद्यालयात योग्य प्रवेश मिळवता आला नाही. तसेच, क्रीडा उपक्रमांसाठी विमाही मिळवता आला नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने रोहित आणि राहुल यांच्यासोबत घडलेल्या घटनेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने म्हटले की, फक्त प्रणालीतील तांत्रिक किंवा बायोमेट्रिक त्रुटीमुळे एका रहिवाशाला न्यायापासून वंचित ठेवता कामा नये. जर लहानपणी बायोमेट्रिक्स चुकीच्या पद्धतीने भरले गेले असतील, तर तो त्या मुलांचा दोष नाही.

सराईत गुन्हेगाराला गावठी पिस्टलसह अटक

■ठाणे । प्रतिनिधी,

बेकायदा प्राणघातक शस्त्र बाळगणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला ठाणे गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने अटक करत मोठी कारवाई केली आहे. आरोपीकडून एक गावठी पिस्टल आणि एक जिवंत काडतूस जप्त केले आहे. ठाणे न्यायालयाने आरोपीला 12 मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. मोगेश म्हात्रे (32) असे आरोपीचे नाव असून तो भिवंडी तालुक्यातील काल्हेर परिसरात राहणार आहे. त्याच्याविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हाही दाखल असल्याचे समोर आले आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-5 अंतर्गत येणाऱ्या कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत फरारी तसेच पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या शोधासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत होती. काल्हेर ते ठाणे सार्वजनिक मार्गावरील न्यू कशेळी ब्रिज परिसरात सुरू असलेल्या तपासणीदरम्यान मोगेश सुनील म्हात्रे हा पोलिसांच्या जाळ्यात अडकला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी पिस्टल आणि एक जिवंत काडतूस सापडले. त्याला 8 मे रोजी अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात कापूरबावडी पोलीस ठाण्यात बेकायदेशीर प्राणघातक शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यात उन्हाचा चटका कायम, तापमानाचा पारा 45 अंशावर, कोणत्या जिल्ह्यात किती तापमानाची नोंद?

■मुंबई। प्रतिनिधी,

दिवसेंदिवस राज्यात उन्हाचा चटका वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या उन्हाचा लोकांना मोठा त्रास होत आहे. राज्याच्या अनेक भागात तापमानाचा पारा 40 अंशाच्या पुढे गेला आहे. तर काही भागात 35 ते 40 अंशाच्या दरम्यान तापमानाचा पारा आहे. दरम्यान मुंबईत देखील तापमानात वाढ होत असल्याचं दिसत आहे. मुंबईतील तापमान चाळीशी नजीक पोहोचले आहे. मुंबईतील तापमानात मागील काही दिवसांत वाढ झाली आहे. जाणून घेऊयात राज्यात कोणत्या शहरात किती तापमान आहे याबाबतची माहिती. मुंबईतील राम मंदिर परिसरात तापमान 39.7अंश सेल्सिअस तापमान नोंदवले आहे. सोबतच, विक्रोळीतही तापमानाचा पारा 38.5 अंश सेल्सिअस झाला आहे. तर वांद्रे परिसरात तापमान 37.3 अंश सेल्सिअस नोंद करण्यात आले आहे. तर मुंबईतील सांताक्रुज परिसरात 35.8 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळा उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळा आता अधिक तीव्र होऊ लागल्या आहेत. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात सध्या पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. जिंतूर तालुक्यातील कौसडी, वाघी धानोरा आणि शेवडी या गावांमध्ये सध्या पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने या गावांसाठी एकूण 5 टँकरने पाणी सुरू केले आहे. त्यामध्ये कौसडी गावासाठी 3 टँकर्स तर शेवडी आणि वाघी धानोरा गावासाठी प्रत्येकी 1 टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाळा जसजसा पुढे सरकत आहे, तसतशी पाण्याची पातळी खालावत असून अनेक विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडू लागल्या आहेत. त्यामुळं ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात टँकर सुरु केले असले तरी आगामी काळात पाणीटंचाई अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



राज्यातील काही महत्त्वाच्या शहरांमधील तापमान

छत्रपती संभाजीनगर - 43.4	नंदुरबार - 45.3
मालेगांव - 43.2	सोलापूर - 42.3
सतारा - 41.1	परभणी - 43.2
जळगाव - 44.3	मुंबई - 35.8
रत्नागिरी - 34	माथेरान - 36.6
नाशिक - 42	अहिल्यानगर - 42.2
नवी मुंबई - 39.2	अकोला - 45.1
बारामती - 41.2	अमरावती - 44
कुलाबा - 35.4	भंडारा - 42
पुणे - 41.6	बुलढाणा - 43.2
अलीबाग - 38.2	ब्रह्मपुरी - 42.2
बीड - 43.5	चंद्रपुर - 41
	नागपुर - 42
	वर्धा - 43.8
	वाशिम - 42.6
	यवतमाळ- 41.4

निदा खानने पीडितेला काय-काय पाठवलं? घरी जाऊन धार्मिक विधी, नावही बदलण्याचा कट; मतीन पटेल अन मावशीचं नाव पुढे, तपासात चक्रावणारी माहिती

■नाशिक। प्रतिनिधी,

निदा खानने पीडितेला काय-काय पाठवलं? घरी जाऊन धार्मिक विधी, नावही बदलण्याचा कट; मतीन पटेल अन मावशीचं नाव पुढे, तपासात चक्रावणारी माहिती

नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणाऱ्या तरुणीवर अत्याचार करून तिचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील मुख्य संशयित निदा खान हिची विशेष तपास पथकाने कसून चौकशी सुरू केली आहे. या चौकशीत अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक बाबी समोर येत आहेत. निदाने केवळ पीडितेचे मतपरिवर्तन केले नाही, तर तिच्या घरात जाऊन स्वतःच्या धमार्चे विधी केल्याचे आणि पीडितेला विशिष्ट प्रार्थना करण्यास भाग पाडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. नाव बदलण्याचा आणि ब्रेनवॉशचा कट संशयित निदा खान हिने पीडितेचे मूळ नाव बदलून 'हानिया' करण्याचा कट रचला होता. यासाठी तिने पीडितेला धार्मिक मुद्द्यांशी संबंधित तब्बल 171 लिंक्स पाठवल्या होत्या, जेणेकरून तिचे पूर्णपणे मतपरिवर्तन करता येईल. पीडितेच्या घरी जाऊन तिला धार्मिक शिक्षण देणे, ठराविक पोशाख परिधान करायला लावणे आणि धमार्ची प्रार्थना घेण्याचे धक्कादायक प्रकार निदाने केल्याचे एसआयटीच्या तपासात उघड झाले आहे. आश्रयदाता आणि 'एमआयएम' कनेक्शनचा तपास 26 मार्चपासून फरार असलेल्या निदाला 7 मे रोजी छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली होती. निदा ज्या फ्लॅटमध्ये लपली होती, तो फ्लॅट तिच्या मावशीचा नसून संशयित एमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांनी उपलब्ध करून दिल्याचे समोर आले आहे. निदा गर्भवती असल्याने तिच्यासोबत तिचे आई-वडील आणि मावशीदेखील तिथे उपस्थित होते. निदा ही 'एमआयएम'च्या नगरसेवकापर्यंत कशी पोहोचली आणि तिला या काळात कोणी आर्थिक रसद पुरवली, याचा तपास आता पोलीस करत आहेत. पोलीस कोठडीत वाढ होण्याची शक्यता निदाची सुरुवातीची पोलीस कोठडी आज, सोमवारी (दि. 11) संपत असल्याने तिला पुन्हा नाशिकरोड न्यायालयात हजर केले जाणार आहे. तपासातील प्रगती आणि गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस तिच्या कोठडीत वाढ करण्याची मागणी करणार आहेत. यासह या प्रकरणातील इतर संशयित दानिश शेख आणि तौसिफ अत्तार यांचाही ताबा एसआयटी घेणार असून, तिघांची समोरासमोर बसवून चौकशी केली जाणार आहे. नाशिकमध्ये नऊ गुन्ह्यांची नोंद निदा खानसह तिच्या साथीदारांविरोधात नाशिकमध्ये आतापर्यंत अत्याचार, विनयभंग, धार्मिक भावना दुखावणे आणि कट रचून धर्मांतर करणे अशा विविध कलमान्वये नऊ गुन्हे दाखल आहेत. मुंबई नाका पोलिसांनीही या टोळीविरोधात कठोर कलमे लावून तपास सुरू केला आहे. निदा खानचा मोबाइल क्लोनिंगसाठी प्रयोगशाळेत पाठवला दरम्यान, ळउर प्रकरणातील आरोपी निदा खान हिचा मोबाईल क्लोनिंगसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आला आहे.

मोबाईलमधून डिलिट केलेले मेसेज, व्हिडीओ आणि संपर्क क्रमांक पुन्हा रिकव्हर करण्यात येणार असून, त्यातून अनेक महत्त्वाच्या बाबींचा उलगडा होण्याची शक्यता आहे. तसेच कॉल डिटेल्स, वारंवार संपर्कात असलेल्या व्यक्ती, फरार काळातील लोकेशन हिस्ट्री आणि प्रवासाचा तपशीलही रक्कळ कढून तपासला जात असल्याची माहिती समोर आली आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय – गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी – ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com